ePaper

## मोदी-शिंदे भेटीने रंगली चर्चा; दिल्ली दौऱ्यावर राजकीय लक्ष



वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 18 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

हडपसरमध्ये भरदिवसा चोरट्यांचा धुमाकूळ!

## सांगोल्यात स्ट्रॉंग रूम फोडली; बोर्डाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

# दहावीचा भूगोलाचा पेपर फुटला!

**महाईन्यूज । पंढरपूर**

**दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेची अत्यंत सुरक्षित मानली जाणारी 'स्ट्रॉंग रूम' फोडून भूगोलाच्या 50 प्रश्नपत्रिकांचा संच चोरून नेल्याची धक्कादायक घटना सांगोला विद्यामंदिर प्रशालेत उघडकीस आली आहे. या चोरीमुळे केवळ सांगोलाच नव्हे तर संपूर्ण राज्य शिक्षण मंडळ हादरले असून गुरूवारी होणाऱ्या भूगोलाच्या पेपरच्या गोपनीयतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण असून, आता बोर्ड काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**







दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी अत्यंत गोपनीय आणि महत्त्वाच्या असलेल्या प्रश्नपत्रिका सांगोला येथील विद्यामंदिर प्रशालेच्या स्ट्रॉंग रूममध्ये कडक सुरक्षा व्यवस्थेत सुरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. या स्ट्रॉंग रूममध्ये कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला प्रवेश मिळू नये यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली होती. मात्र, तरीही रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी या स्ट्रॉंग रूमचे कुलूप तोडत आत प्रवेश केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

या घटनेदरम्यान चोरट्यांनी आत ठेवलेल्या कपाटांमधून भूगोल विषयाच्या सुमारे ५० प्रश्नपत्रिका लंपास केल्याचे समोर आले आहे. शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे परीक्षा केंद्रावरील कर्मचारी कामासाठी आले असता ही बाब त्यांच्या निदर्शनास आली.

### बोर्डाच्या निर्णयाकडे लक्ष

प्रश्नपत्रिका चोरीला गेल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, प्रश्नपत्रिका चोरीला गेल्यामुळे हा पेपर रद्द होणार की नवीन प्रश्नपत्रिका संच पुरवले जाणार, याबाबत शिक्षण मंडळाने अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाही.





### नेमकं काय झालं?

सकाळी शिक्षण विभाग आणि कस्तोडियन हे कालचे उरलेले पेपर बोर्डाकडे पोस्टात टाकण्यासाठी आले असता स्ट्रॉंग रूमचे कुलूप तोडल्याचे दिसून आले. सांगोला शहरातील सांगोला विद्यामंदिर येथे बोर्ड परीक्षेचे सर्व पेपर ठेवण्याचे स्ट्रॉंग रूम असून या स्ट्रॉंग रूम मधून ही चोरी झाली आहे. आज सकाळी साडेआठ वाजता या स्ट्रॉंग रूम जवळ अधिकारी पोचल्यावर कुलूप कापल्याचे दिसून आले. उद्या पेपर असतानाच अशा प्रकारची घटना घडल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये भीतीचे आणि संभ्रमाचे वातावरण आहे. परीक्षेच्या गोपनीयतेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने शिक्षण विभागाच्या कारभारावरही टीका होत आहे.

### ड्युटीवर असलेला कर्मचारी त्यावेळी नेमका कुठे होता?

या चोरीने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. विशेष म्हणजे, ज्या स्ट्रॉंग रूमसमोर चोवीस तास कडक बंदोबस्त असणे अपेक्षित होते, तिथे चोरी झालीच कशी? असा सवाल उपस्थित होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे घटनेच्या वेळी स्ट्रॉंग रूमसमोरील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे समोर आले आहे. चोरट्यांनी नियोजनबद्धरीत्या हे कृत्य केल्याचा संशय आहे. तसेच, ड्युटीवर असलेला कर्मचारी त्यावेळी नेमका कुठे होता, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# हडपसरमध्ये भरदिवसा चोरट्यांचा धुमाकूळ!

## तरुणांच्या दहशतीमुळे गाडीतळ परिसरातील रहिवासी त्रस्त; कारवाईची मागणी

**महाईन्यूज । पुणे**

**भरदिवसा सोसायटींमध्ये शिरून दुचाकीमधील पेट्रोल चोरणे, बंद घरांचे कुलूप तोडून घरात शिरणे, रस्त्यावर अडवून धमकावणे, पैसे, मोबाईल हिसकावणे, अशी कृत्ये करणाऱ्या परिसरातील थिल्लर तरुणांच्या दहशतीमुळे गाडीतळ परिसरातील रहिवासी त्रस्त झाले आहेत. गेली अनेक वर्षांपासून हे प्रकार चालू आहेत. वारंवार तक्रार करूनही त्याबाबत कोणतेही प्रशासन गांभीर्याने घेत नसल्याची तक्रार येथील रहिवाशांनी केली आहे.**



गाडीतळ परिसरात स्वमालकीची बैठी घरे व काही इमारतींमधून मोठ्या प्रमाणात मिळकतधारक व भाडेकरू राहत आहेत. याशिवाय आसपासच्या परिसरात काही वसाहतीही आहेत. या वसाहती मधील काही तरुण व किशोरवयीन मुले व्यसनांच्या आहारी जावून येथील नागरिकांना त्रास होईल असे वर्तन करताना दिसतात. अनेकदा ही मुले चाकू, कोयता, तलवारी यासारख्या हत्यारांचा धाक दाखवून जीवे मारण्याच्या धमक्या देत दहशत निर्माण करत आहेत. पार्किंग मधील वाहनांचे पेट्रोल-डिझेल, थेट घरात घुसून पैसे-मोबाईल चोरणे, रस्त्यावर महागड्या चिजवस्तू हिसकावणे अशी कृत्ये ही मुले करीत आहेत. त्यांचे हे प्रमाण सध्या वाढले आहे. त्यामुळे येथील महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे.

या मुलांना विरोध केल्यास नंतर जमावाने येवून जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. त्यामुळे येथील अनेक नागरिक मूकपणे हा त्रास सहन करीत आहेत. या मुलांच्या विरोधात बोलण्यास कोणीही पुढे येत नाही. महिला मुलींना एकटे केवळ बाहेरच नव्हे तर घरामध्येही राहण्याची भीती निर्माण झाली आहे. जवळच असलेल्या पालिकेच्या महात्मा फुले माध्यमिक विद्यालयाचा आणि बंटर शाळेचा उपयोग हे गुंड लपण्यासाठी आणि नागरिकांना लुटण्यासाठी करत असतात. त्यांनी काही सोसायट्यांमधून अनधिकृत वहिवाटही सुरु केली आहे. विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने लावल्या जाणाऱ्या ध्वनीवर्धकामुळेही ज्येष्ठ नागरिक, रुग्ण व विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परीसरातील अनेक कुटुंबे भीतीमुळे आणि मुलांच्या काळजीपोटी येथून स्थलांतरीत झाली आहेत. तर, अनेकजण स्थलांतराच्या मार्गावर असलेले पाहवयास मिळत आहे.

या त्रासाबाबत पोलिस प्रशासनाला अनेकदा कळवले आहे. मात्र, त्यांच्याकडून कोणतीही ठोस व कडक कारवाई होत नाही. पोलीस आम्हाला काहीच करू शकत नसल्याचेही त्यांच्याकडून बिनधास्तपणे सांगितले जात असल्याचे येथील रहिवासी सांगत आहेत. पोलिस प्रशासनाने या गुंडगिरीवर त्वरित कारवाई करून त्यांची दहशत मोडून काढावी. तसेच, हनुमान मंदिर रस्त्यावर सीसीटीव्ही बसवण्यात येवून सातत्याने पेट्रोलिंक करावे, अशी मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.

## सिलेंडरचे वितरण फक्त OTP द्वारेच होणार, ९६ तासांत घरपोच; जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**महाईन्यूज । पुणे**

**घरगुती गॅस सिलेंडरचे वितरण केवळ OTP प्रणालीद्वारेच करण्यात येणार असून गॅस बुकिंग केल्यानंतर ९६ तासांच्या आत सिलेंडर घरपोच देणे बंधनकारक राहील, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील सर्व तेल कंपन्या व गॅस एजन्सींच्या प्रतिनिधींना घरगुती गॅस सिलेंडर वितरणाबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.**




### गॅस वितरणात अडथळा आणल्यास कडक कारवाई

दरम्यान, गॅस वितरणाची ही प्रक्रिया सुरळीत आणि नियमांनुसार सुरू राहावी यासाठी पोलिस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. जर कोणी व्यक्ती किंवा गट या प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्यांच्याविरुद्ध कठोर आणि तातडीने कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

बैठकीदरम्यान घरगुती वापरासाठी असलेल्या गॅस सिलेंडरच्या वितरण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि सुरक्षा राखण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यानुसार, गॅस सिलेंडरचा पुरवठा केवळ OTP (वन टाइम पासवर्ड) प्रणालीद्वारेच करण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. यासोबतच गोदाम, गॅस एजन्सी किंवा इतर कोणत्याही ठिकाणाहून थेट ग्राहकांना गॅस सिलेंडर देण्याची पद्धत पूर्णपणे बंद ठेवण्याच्या सूचना संबंधित तेल कंपन्या तसेच सर्व गॅस वितरकांना देण्यात आल्या आहेत.

या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व गॅस एजन्सींनी त्यांच्या गोदाम, कार्यालय किंवा वितरण केंद्राबाहेर स्पष्ट सूचना दर्शविणारे फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. या फलकांवर "गॅस सिलेंडरचे वितरण फक्त OTP द्वारेच ९६ तासांच्या आत घरपोहोच करण्यात येईल" असा स्पष्ट उल्लेख असावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून ग्राहकांना योग्य माहिती मिळेल



आणि अनावश्यक गर्दी टाळता येईल.

तसेच, जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींनी त्यांच्या नोंदणीकृत ग्राहकांच्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे (SMS) माहिती पाठवण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. या संदेशामध्ये "गॅस सिलेंडरचे वितरण फक्त OTP द्वारेच ९६ तासांच्या आत घरपोहोच करण्यात येईल, त्यामुळे कृपया गॅस एजन्सीसमोर गर्दी करू नये" असा स्पष्ट संदेश देण्यास सांगितले आहे.

याशिवाय, ग्राहकांनी गॅस सिलेंडरचे बुकिंग केल्यानंतर ९६ तासांच्या आत घरपोहोच सेवा देणे गॅस वितरकांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमाचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले असून, वितरण प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई होऊ नये यावर विशेष भर देण्यात आला आहे.दरम्यान, गॅस वितरणाची ही प्रक्रिया सुरळीत आणि नियमांनुसार सुरू राहावी यासाठी पोलिस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. जर कोणी व्यक्ती किंवा गट या प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्यांच्याविरुद्ध कठोर आणि तातडीने कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महिला बचत गटांचा गौरव

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी महापालिकेचा विशेष उपक्रम; विविध क्षेत्रातील कार्याचा गौरव

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**महिलांचे योगदान समाजासाठी खूप मोठे आहे. एक महिला स्वतः सक्षम झाल्यानंतर ती तिच्या संपूर्ण कुटुंबाला सक्षम करीत असते. त्यामुळे आज प्रत्येक महिला सक्षम व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबवणे गरजेचे असून त्यासाठी महापालिकेचा समाज विकास विभाग सक्षमपणे कामकाज करीत आहे असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले.**



जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते आणि माजी आमदार अश्विनी जगताप, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणी पठारे, डॉ.श्रद्धा रवि लांडगे, प्रिया आण्णा बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास नगरसदस्या माई काटे,नीता पाडाळे, कुंदा भिसे,अनिता काटे, प्रतीक्षा लांघी जवळकर, पल्लवी जगताप, रेश्मा भुजबळ, सुलभा उबाळे, सुप्रिया चांदगुडे, रिटा सानप, सारिका बोऱ्हाडे, शिवानी नरळे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे, निकिता कदम, सारिका मासुळकर, सोनम मोरे, मनीषा लांडे, पल्लवी वाळके, श्रुती वाकडकर, वर्षा जगताप, निकिता कदम, पल्लवी वाल्हेकर, कुंदा भिसे, श्रुती डोळस, वैशाली काळभोर,माजी नगरसदस्या उषा मुंढे,उपायुक्त ममता शिंदे, चेतना केरूरे, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागात काम करणाऱ्या महिला अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटातील महिला मोठ्या उपस्थित होत्या.

### सन्मान झालेले बचतगट फेडरेशन

- संजीवनी स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित
- उड्डाण स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित
- आरंभ स्वयंरोजगार महिला सहकारी संस्था मर्यादित
- झेप स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित
- एकता स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित
- गरुडझेप स्वयंरोजगार महिला सहकारी संस्था मर्यादित
- अल्फा स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित

माजी आमदार आश्विनी जगताप म्हणाल्या की, महिलांचा विकास झाला तरच समाजाचा विकास शक्य होईल. प्रत्येक महिलेने स्वतःच्या पायावर उभे राहून सक्षम व्हावे, असे सांगतानाच 'निरोगी रहा, आनंदी रहा, हसत रहा,' असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी उपस्थित महिलांना दिला. महिला दिनाचे औचित्य साधत शहरातील बसस्थानके, बाजारपेठा, मंडई, मार्केट तसेच गर्दीच्या ठिकाणी महिला आणि दिव्यांगांसाठी सर्व सुविधायुक्त आधुनिक स्वच्छतागृहे उभारण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणी पठारे यांनी केली. शहरातील महिलांना स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्यामुळे त्यांची होणारी गैरसोय आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन हा उपक्रम लवकरच राबविण्यात येणार आहे. यामुळे महिलांसाठी स्वतंत्र आधुनिक स्वच्छतागृहे उभारणारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका राज्यातील पहिली महानगरपालिका ठरणार आहे असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त ममता शिंदे यांनी केले तसेच संगणकीय सादरीकरणातून समाज विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या उपक्रमांची माहितीही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार समाज विकास अधिकारी संतोषी चोरगे यांनी मानले.

### सन्मान झालेले बचतगट

निसर्ग महिला बचत गट
महिला बचत गट
स्वामी समर्थ महिला बचत गट
नवक्षितिज महिला बचत गट
गृहिणी महिला बचत गट
अस्तित्व महिला बचत गट
श्री तुळजाभवानी महिला बचत गट
कृष्णा महिला बचत गट
रायगड महिला बचत गट
राजमाता महिला बचत गट
आराध्या महिला बचत गट
दत्तकृपा महिला बचत गट
मैत्री दिव्यांग महिला बचत गट
क्रांतीज्योती महिला बचत गट
विजयालक्ष्मी महिला बचत गट
समिता महिला बचत गट
दिव्यज्योती महिला बचत गट
मेरूशिखर महिला बचत गट

# "प्रशिक्षण ही प्रक्रिया नव्हे, तर विचारांना धार देणारे माध्यम": शत्रुघ्न काटे

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**"प्रशिक्षण ही केवळ प्रक्रिया नसून कार्यकर्त्यांच्या विचारांना धार देणारे माध्यम आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा 'एकात्म मानववाद' शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवणे हेच आपले ध्येय आहे," असे प्रतिपादन शत्रुघ्न काटे यांनी केले. काळेवाडी येथे पार्वती इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान – २०२६' अंतर्गत चिंचवड-काळेवाडी मंडळ प्रशिक्षण वर्गाचा समारोप उत्साहात पार पडला.**



> आपल्या प्रत्येक कार्यकर्त्याने 'मै भी पन्ना प्रमुख' या जिद्दीने काम केले तरच आगामी महापालिका आणि इतर निवडणुकांमध्ये भाजपचा झेंडा अधिक मजबुतीने फडकेल. सेवा ही केवळ कर्तव्य नाही, तर जनतेपर्यंत विचार आणि योजनांचा प्रवेश करुन देण्याचा मार्ग आहे.
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

दोन दिवसीय प्रशिक्षणाला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शत्रुघ्न काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हा समारोप सोहळा झाला.

यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना विचारधारेचे पाईक बनून जनसेवेसाठी सज्ज होण्याचे आवाहन केले. आजचा कार्यकर्ता तंत्रस्नेही आणि अभ्यासू असणे गरजेचे असून केवळ घोषणाबाजी न करता शासनाच्या योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रत्येकाने सेवाभावाने काम केले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. "काळेवाडी मंडळातील प्रत्येक कार्यकर्त्याने 'मै भी पन्ना प्रमुख' या जिद्दीने कामाला लागावे," असेही त्यांनी नमूद केले. या प्रशिक्षणात पक्षाची ध्येयधोरणे, अंत्योदय संकल्पना आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बूथ सक्षमीकरण या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आमदार शंकर जगताप, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, मधुकरभाऊ बच्चे, ॲड. हर्षदभाऊ नढे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख आणि युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी महापालिका आणि इतर निवडणुकांमध्ये भाजपचा झेंडा अधिक बळकट करण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला.



## भूमिका

**पश्चिम आशियातील परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर बनत चालली आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहू यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या मोठ्या हल्ल्यानंतर सुरू झालेला संघर्ष आता केवळ लष्करी सीमारेषांपुरता मर्यादित राहिलेला नाही.**

# कधी संपणार हा संघर्ष?



तो नागरी जीवन, जागतिक अर्थव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यांनाही हादरवून सोडणारा ठरला आहे. त्यामुळेच आज सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो—हे रण कधी संपणार? या संघर्षातील सर्वात धक्कादायक घटना म्हणजे अली खामेनी यांच्या मृत्यूची बातमी. 1989 पासून इराणच्या सत्तेचा केंद्रबिंदू असलेल्या या नेत्याचा हल्ल्यात मृत्यू होणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचा अंत नसून, संपूर्ण विचारसरणीवर झालेला थेट प्रहार मानला जातो. अशा परिस्थितीत इराणकडून तीव्र प्रत्युत्तर येणे अपरिहार्य होते. त्यामुळेच इराणने आखातातील अमेरिकेच्या आणि इस्रायलच्या मित्रदेशांवर हल्ले सुरू ठेवले आहेत. या संघर्षाचे स्वरूप आता अधिक धोकादायक झाले आहे. सुरुवातीला लष्करी तळ, क्षेपणास्त्र प्रणाली आणि रणनीतिक ठिकाणे लक्ष्य केली जात होती. मात्र आता नागरी भाग, ऊर्जा प्रकल्प आणि व्यापारी मार्ग यांनाही लक्ष्य केले जात आहे. याचा अर्थ युद्ध केवळ सैन्यापुरते मर्यादित राहिलेले नसून ते सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात थेट घुसले आहे. हीच या संघर्षाची खरी भीषणता आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक गोंधळ निर्माण झाला आहे. एकीकडे ते युद्ध "जवळपास संपले" असल्याचा दावा करतात, तर दुसरीकडे "आणखी कठोर कारवाई" करण्याचे संकेत देतात. या विरोधाभासी भूमिकेमुळे जागतिक अनिश्चितता वाढली आहे. उलटपक्षी, बेंजामिन नेतन्याहू यांची भूमिका अधिक स्पष्ट आणि आक्रमक आहे—"जोपर्यंत गरज आहे, तोपर्यंत कारवाई सुरू राहील." यावरून इस्रायल हा संघर्ष दीर्घकालीन मोहिमेच्या रूपात पाहत असल्याचे दिसते. या युद्धाचा परिणाम केवळ रणांगणापुरता मर्यादित राहिलेला नाही. पश्चिम आशियातील हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे हजारो उड्डाणे रद्द झाली आहेत. आंतरराष्ट्रीय प्रवास विस्कळीत झाला असून, जागतिक वाहतूक व्यवस्थेला मोठा धक्का बसला आहे. कतार एअरवेज आणि एमिरेट्ससारख्या विमान कंपन्यांना मर्यादित सेवा चालवावी लागत आहे, तर नागरिकांना सुरक्षित परत आणण्यासाठी विशेष उड्डाणे सुरू करण्यात आली आहेत.

इतिहास पाहता, पश्चिम आशियातील युद्धे पटकन संपत नाहीत. कारण ही युद्धे केवळ भूभागासाठी नसून विचारसरणी, वर्चस्व आणि सुरक्षिततेच्या मुद्द्यांवर आधारित असतात. इराणसाठी हे अस्तित्वाचे युद्ध आहे, तर अमेरिका आणि इस्रायलसाठी तो सुरक्षेचा प्रश्न आहे. त्यामुळे संघर्षाचा कालावधी अंदाज बांधणे कठीण आहे. काहीजण सहा आठवड्यांचा अंदाज व्यक्त करतात, परंतु वास्तव अधिक गुंतागुंतीचे असू शकते.

भारतासाठी या संघर्षाचे परिणाम गंभीर ठरू शकतात. देशाची सुमारे 80 टक्के तेल आयात पश्चिम आशियावर अवलंबून आहे. या भागातील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किंमती आधीच 10 ते 15 टक्क्यांनी वाढल्या आहेत. याचा थेट परिणाम पेट्रोल-डिझेल दरांवर होणार असून महागाई वाढण्याची शक्यता आहे. तसेच, आखातातील देशांमध्ये काम करणारे सुमारे 90 लाख भारतीय नागरिकही धोक्यात आले आहेत. त्यांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारकडून विशेष उपाययोजना सुरू आहेत.

व्यापारी मार्गांवर झालेल्या परिणामामुळे भारताची निर्यातही प्रभावित होत आहे. रसायने, औषधे आणि अभियांत्रिकी उत्पादनांच्या शिपमेंटमध्ये विलंब होत आहे. तज्ज्ञांच्या मते, हा संघर्ष दीर्घकाळ चालल्यास भारताच्या जीडीपी वाढीवर 0.5 ते 1 टक्क्यांचा परिणाम होऊ शकतो. शेअर बाजारातही अस्थिरता वाढलेली दिसून येते.

## प्रासंगिक »

### हरवलेला आत्मविश्वास

***एक व्यावसायिक प्रचंड कर्जात अडकला होता. धनको सतत तगादा लावत होते आणि त्याला मार्ग दिसत नव्हता.***

एके दिवशी तो उद्यानात निराश होऊन बसला असताना एक वृद्ध त्याच्याशी बोलला आणि त्याला ५ लाख डॉलर्सचा चेक देऊन एक वर्षानंतर परत भेटण्यास सांगितले. चेकवरील सही जगप्रसिद्ध श्रीमंत व्यक्तीची होती. व्यावसायिकाने तो चेक वटवला नाही, त्याने करारांमध्ये सुधारणा केल्या, देयकांची मुदत वाढवली आणि व्यवसाय पुन्हा उभा केला. काही महिन्यांतच तो कर्जमुक्त झाला आणि नफा कमवू लागला. एक वर्षानंतर तो चेक परत देण्यासाठी गेला, पण तेव्हा समजले की तो वृद्ध मानसिक रुग्ण होता आणि तो स्वतःला श्रीमंत समजत असे. हे पाहून व्यावसायिक थक्क झाला. त्याला जाणवले की त्याच्या यशामागे त्या चेकची किंमत नव्हती, तर त्यातून मिळालेला आत्मविश्वास होता. खरी ताकद पैशात नसून आपल्या मनात आणि विश्वासात असते याच आत्मविश्वासाने त्याचे आयुष्य बदलले.

**तात्पर्य-** आत्मविश्वासाने कोणतेही कार्य केल्यास यश हे हमखास मिळते.

सैन्यात लष्करी अधिकाऱ्यांचं महत्त्व अनन्यसाधारण असतं. अधिकारी जितका अनुभवी आणि उच्च पदावरचा, तितकं त्याच्या निर्णयांना अधिक वजन प्राप्त होतं. युद्ध, किंवा संवेदनशील मोहिमांच्या वेळी अशा अधिकाऱ्यांचं मार्गदर्शन अत्यंत निर्णायक ठरतं.

# सैनिक नाही, आता एआय चॅटबॉट्स लढतील युद्ध!



कारण रणांगणावर घेतलेला एक चुकीचा निर्णय हजारो सैनिकांचे प्राण धोक्यात घालू शकतो आणि देशाच्या सुरक्षेलाही गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. त्यामुळेच धोरणात्मक निर्णय घेण्याची जबाबदारी नेहमीच तज्ज्ञ, अभ्यासू आणि अनुभवी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर सोपवली जाते.

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानाचा वापर युद्धात अनिवार्य झाला आहे. जो देश तंत्रज्ञानात प्रगत, त्याला युद्धाच्या वेळी मोठा फायदा मिळतो. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रात झपाट्याने होणारी प्रगती लष्करी धोरणांनाही प्रभावित करत आहे. विविध क्षेत्रांप्रमाणेच आता संरक्षण व्यवस्थेतही AI चा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अमेरिकेसारख्या महासत्तांनी या क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली असून, अनेक मोठ्या टेक कंपन्यांसोबत करार करून AI तंत्रज्ञानाचा लष्करी वापर सुरू केला आहे.

या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. AI च्या वाढत्या वापरामुळे मानवी अधिकाऱ्यांचं महत्त्व कमी होणार का? भविष्यात युद्धातील काही महत्त्वाचे निर्णय AI चॅटबॉट्सच्या सल्ल्यावर घेतले जाऊ शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. उदाहरणार्थ, कोणत्या ठिकाणी हल्ला करायचा, कोणत्या लक्ष्याला प्राधान्य द्यायचं, किंवा कोणत्या वेळी कारवाई करायची—या बाबतीत AI प्रणालींचा सल्ला घेतला जाऊ शकतो. त्यामुळे रणांगणावर केवळ सैनिक आणि अधिकारीच नव्हे, तर संगणकाच्या स्क्रीनवरील AI प्रणालीही महत्त्वाची भूमिका बजावू लागल्या आहेत.

अमेरिकेच्या संरक्षण विभागाने अलीकडेच काही प्रगत AI कंपन्यांसोबत करार करून गुप्त लष्करी मोहिमांमध्ये AI चा वापर सुरू केला आहे. याआधी 'मॅव्हन'सारख्या प्रकल्पांच्या मदतीने ड्रोन फुटेज आणि प्रतिमांमधून लक्ष्य ओळखण्याचं काम केलं जात होतं. आता त्यात अधिक प्रगत AI प्रणालींचा समावेश करण्यात आला आहे, ज्या केवळ डेटा विश्लेषणच करत नाहीत, तर संभाव्य निर्णयांबाबत सल्लाही देतात.

तथापि, या तंत्रज्ञानासोबत काही गंभीर धोकेही आहेत. AI प्रणाली अनेकदा थेट निष्कर्ष देतात, पण त्या निष्कर्षांची अचूकता पडताळणं अत्यंत महत्त्वाचं असतं. जर चुकीच्या किंवा अपूर्ण डेटावर आधारित निर्णय घेतले गेले, तर त्याचे परिणाम अत्यंत भीषण ठरू शकतात. त्यामुळे AI कितीही प्रगत झालं तरी अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी माणसांकडेच राहणं गरजेचं आहे. मानवाचा अनुभव, समज आणि नैतिकता यांची जागा कोणतंही तंत्रज्ञान पूर्णपणे घेऊ शकत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



**पांडुरंग म्हणे माझे।**
**सारे करीन काजे॥१॥**

**तुका म्हणे देवा।**
**माझे काही नाही आजे॥ध्रु.॥**

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# परिवहन मंत्र्यांची मोठी घोषणा!

## एसटी महामंडळात १७ हजार ७४२ चालक-वाहकांची कंत्राटी भरती

महाईन्यूज । मुंबई

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) तब्बल १७ हजार ७४२ चालक व वाहक कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ही भरती एसटी महामंडळात लवकरच दाखल होणाऱ्या ८ हजार ३०० नव्या बसेससाठी करण्यात येणार आहे.**



सरकारकडून नियमित भरतीसाठी अर्थ विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मात्र, त्या भरतीस मंजुरी मिळेपर्यंत ही कंत्राटी भरती केली जाणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. मागील वर्षीही कंत्राटी मेगाभरतीची घोषणा करण्यात आली होती, मात्र ती काही कारणांमुळे पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे यंदा घोषित केलेली भरती प्रत्यक्षात कधी सुरू होणार, याकडे इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

या कंत्राटी भरतीत निवड झालेल्या उमेदवारांना सुमारे ३० हजार रुपये मासिक वेतन देण्यात येणार आहे. तसेच, निवड झालेल्या चालक व सहाय्यकांना एसटीकडून आवश्यक प्रशिक्षणही दिले जाणार आहे, जेणेकरून सेवा दर्जेदार व सुरक्षित राहील. या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही परिवहन मंत्र्यांनी केले आहे.

दरम्यान, एसटी महामंडळात नव्या बसेसची भर पडल्यामुळे प्रवाशांना अधिक चांगली, अखंडित आणि सुरक्षित बससेवा देणे शक्य होईल, असा विश्वासही सरनाईक यांनी व्यक्त केला. वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करता मनुष्यबळाची गरज भागवण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### १७ हजार ४५० रिक्त जागांसाठी भरती

एसटी महामंडळाकडून कंत्राटी पद्धतीने सुमारे १७ हजार ४५० चालक व सहाय्यकांची भरती केली जाणार आहे. या भरतीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून ती राज्यातील ६ प्रादेशिक विभागांनुसार केली जाण्याची शक्यता आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थांकडून एसटी महामंडळाला आवश्यक मनुष्यबळ वेळेत उपलब्ध करून दिले जाईल.

### नव्या बसेससाठी भरती

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानपरिषदेत बोलताना सरनाईक यांनी ही घोषणा केली. ते म्हणाले की, नव्या बसेसची खरेदी केल्यानंतर त्या चालवण्यासाठी आणि सेवा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यामुळे तातडीने कंत्राटी भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## ड्रग्सविरोधात ‘झिरो टॉलरन्स’ धोरण राबविणार; गुन्हेगारांची संपत्तीही जप्त करणार

महाईन्यूज । मुंबई

**नागपूर शहरातील मोतीबाग परिसरात अमली पदार्थ (ड्रग्स) तस्करांविरोधात झालेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन अमली पदार्थांविरोधात ‘झिरो टॉलरन्स’ धोरण राबविणार आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींची संपत्ती जप्त करण्यासह कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.**



मोतीबाग येथील ड्रग्स तस्करांच्या घरांवर छापे टाकून गांजा व अग्निशस्त्रांचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत सदस्य प्रवीण दटके यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत विकास ठाकरे, विक्रम पाचपुते आणि डॉ. नितीन राऊत यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संबंधित प्रकरणात सामाजिक गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध चार्जशीट दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील टप्प्यात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई केली जाणार आहे.

बेकायदेशीर बांधकाम आढळल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नोटीस देऊन महानगरपालिकेमार्फत योग्य ती कारवाई केली जाईल. तसेच संबंधित भागात विशेष मोहीम राबवून अशा गुन्ह्यांना आळा घालण्यात येईल. भविष्यात अशा घटना घडल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नागपूर पोलिसांनी ‘ऑपरेशन थंडर’ अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कारवाया करत गेल्या ११ महिन्यांत ९०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवायांमध्ये सुमारे १२५४ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत अंदाजे १० कोटी रुपये आहे. राज्यात ड्रग्सविरोधी कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२३ रोजी अँटी नारकोटिक टास्क फोर्स (ANTF) स्थापन करण्यात आली आहे. ही यंत्रणा राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांपर्यंत विस्तारण्यात आली असून नवीन पदनिर्मितीद्वारे ती अधिक बळकट करण्यात आली आहे.

केंद्र शासन व इतर राज्यांशी समन्वय वाढवून इंटेलिजन्स शेअरिंग केल्यामुळे आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय ड्रग्स नेटवर्कवर कारवाई शक्य होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस नमूद केले. ड्रग्स प्रकरणांमध्ये केवळ गुन्हा नोंदवून थांबणार नसून ‘फॉरवर्ड’ आणि ‘बॅकवर्ड’ लिंक शोधून संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्यावर भर दिला जात आहे. तसेच अशा गुन्ह्यांमध्ये थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाऐवजी थेट बडतर्फीची कारवाई केली जाईल.

अल्पवयीन मुलांचा ड्रग्स तस्करीत वापर होत असल्याची बाब गंभीर असल्याचे नमूद करत, अशा गुन्ह्यांसाठी कायदेशीर वयोमर्यादा १८ वरून १६ वर्षे करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

यासोबतच, राज्यभरात ड्रग्सविरोधी जनजागृती मोहिमा अधिक व्यापक करण्यावरही भर दिला जाणार आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करून तरुणांमध्ये जागरूकता वाढवली जाणार आहे. स्थानिक नागरिकांच्या सहभागातून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्याची यंत्रणा मजबूत केली जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ड्रग्स नेटवर्कचा माग काढण्याची क्षमता वाढवण्यात येणार आहे.

# नरेंद्र मोदींसोबत एकनाथ शिंदेंची बैठक!

## एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्याबाबत राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दर अधिवेशनात खासदारांना भेटण्यासाठी दिल्लीला येतो. आमच्या खासदारांना भेटलो. पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना भेटलो. ही सदिच्छा भेट होती. कोण टीका करत आहे, कोण काय बोलत आहे, यापेक्षा मला काय करायचे ते करत असतो. विरोधक नेहमी टीका करण्याचे काम करत असतात. टीकेला कामाने उत्तर देत असतो, असे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्टपणे सांगितले.**



### अमेरिका-इराण-इस्रायल युद्धाबाबत चर्चा केली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी इराण इस्रायल युद्धाबाबत चर्चा केली. देशातील सगळ्यांनी एकसंघ राहिले पाहिजे. एनडीए संपूर्णपणे मोदींच्या पाठिशी आहे. दुबई, मस्कत, कुवेतमध्ये जे भारतीय अडकले होते, त्यांना आणण्याचे काम केले आहे. पंतप्रधान मोदींना सांगितले की, अनेक देशांशी तुमचे चांगले संबंध आहेत. देश जेव्हा अडचणीत असतात तेव्हा एकमेकांना मदत करतो. इराणने होर्मुझमधून दोन जहाजे आली आहेत. यावरही चर्चा झाली, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

दिल्ली दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुमारे दीड-दोन तास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा केल्याचे म्हटले जात आहे. यानंतर पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली. किरेन रिजिजू यांनी श्रीकांत शिंदेंचे कौतुक केले. श्रीकांत शिंदे यांचेही सगळ्यांशी चांगले राजकीय संबंध आहेत, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, खासदार नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरेंवर टीका करताना विधान परिषदेचे आमदार व्हायचे असेल तर एकनाथ शिंदेंना फोन करा. एकनाथ शिंदे हे मोठ्या मनाचे नेते आहेत, असे विधान केले होते. यावर पत्रकारांनी एकनाथ शिंदेंना प्रश्न विचारला. उद्धव ठाकरेंनी विधानपरिषदेसाठी फोन केला तर मदत करणार का?, असे पत्रकारांनी विचारताच, राज्यसभेची निवडणूक झाली. आता विधानपरिषदेची निवडणूक येईल, तेव्हा बघू, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### पंतप्रधानांना पाठिंबा दिला पाहिजे

विरोधी पक्ष, सत्ताधारी या सगळ्यांनी एकसंघ राहिले पाहिजे. पंतप्रधानांना पाठिंबा दिला पाहिजे. दुर्दैवाने युद्धजन्य परिस्थितीत विरोधक राजकारण करत आहेत. राजकारण करता कामा नये. गॅस, इंधन तुटवडा आहे असे सांगतात, त्यामुळे साठेबाजांना संधी मिळते, हे ते लक्षात घेत नाहीत. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी विरोधक असेच वागले. पाकिस्तानात हेडलाइन व्हाव्यात म्हणून काही लोक बोलतात, हे काही योग्य नाही. इंधनाचा बेकायदेशीर स्टॉक कुणीही करू नये. सिलिंडरचा तुटवडा भासू देणार नाही हे केंद्राने स्पष्ट केले आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

## राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी हल्ल्यात ठार; इस्रायलचा दावा

**महाईन्यूज । इराण**

**इस्रायलने इराणला आणखी एक मोठा झटका दिला आहे. इस्रायली हल्ल्यांमध्ये इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी लक्ष्य करण्यात आल्याचा दावा इस्रायली माध्यमांनी केला आहे. या हल्ल्यात लारीजानी ठार झाले आहेत, असे वृत्त बीबीसीने प्रसिद्ध केले आहे. लारीजानी इराणच्या प्रशासनातील एक प्रमुख व्यक्ती मानले जात होते.**



### अयातुल्लांच्या जवळचे व्यक्ती लारीजानी

लारीजानी अयातुल्ला खामेनी यांच्या अगदी जवळचे आणि विश्वासू व्यक्ती म्हणून ओळखले जात होते. लारीजानी यांचा मृत्यू इराणसाठी मोठा धक्का ठरणार आहे. अयातुल्ला यांच्या मृत्यूनंतर लारीजानी यांचा मृत्यू इराणसाठी मोठा झटका देणारा असेल. लारीजानी तेहरानमध्ये विविध कार्यक्रमात उपस्थित राहिले होते. इराणच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या माहिती देणाऱ्यांना अमेरिकेने १० मिलियन डॉलर एवढे बक्षीस जाहीर केले होते. यात लारीजानी यांचाही समावेश होता.

### इस्राइल कडून इराणच्या सुरक्षा प्रमुखांना लक्ष्य

इस्रायली लष्कराने रिव्होल्युशनरी गार्ड्स्या स्वयंसेवक असलेल्या बसिज दलाचे प्रमुख गुलाम रझा सोलेमानी यांना ठार केल्याचेही सांगितले. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात ८६ वर्षीय सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी मारले गेल्यानंतर, या हत्यांमुळे इराणी प्रशासनातील आणखी एका सर्वोच्च नेत्याचा मरण पावला आहे. दरम्यान, इराणच्या अधिकाऱ्यांकडून याबाबत कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे रॉयटर्सने म्हटले आहे. इस्रायलने रात्रीच्या सुमारास हा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे.

### इस्रायचा कारवाईच्या वृत्ताला दुजोरा

इस्रायली हवाई हल्ल्यात पॅलेस्टिनी इस्लामिक जिहादचे नेते अक्रम अल-अजौरी यांच्यासह गटाच्या इतर वरिष्ठ सदस्यांना लक्ष्य करण्यात आल्याचे संरक्षण सूत्रांचा हवाला देत वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. इस्रायल संरक्षण दलाचे चीफ ऑफ स्टाफ लेफ्टनंट जनरल आयल झमीर यांनी या कारवाईच्या वृत्ताला दुजोरा दिला होता. झमीर यांनी मंगळवारी सकाळी दिलेल्या माहितीत इराणवरील हल्ल्याची माहिती दिली. या कारवाईमुळे पश्चिम आशियातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### लारीजानी यांची मुस्लिम राष्ट्रांविरोधात नाराजी

लारीजानी यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी मुस्लिम राष्ट्रांविरोधात नाराजी व्यक्त केली होती. इराणचे युद्ध इस्रायल आणि अमेरिकेविरोधात आहे. इराणला समर्थन न देणाऱ्या मुस्लिम राष्ट्रांवर लारीजानी यांनी नाराजी व्यक्त केली होती. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मुस्लिम राष्ट्रांमधील एकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच, या भूमिकेमुळे भविष्यातील राजनैतिक संबंधांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पनवेल हायवेवर जन्नत जुबैरवर हल्ला!

टेलिव्हिजन अभिनेत्री आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर जन्नत जुबैर हिच्यावर नुकताच हल्ला झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेत तिचा भाऊ अयान जुबैर देखील तिच्यासोबत होता. ही घटना १५ मार्च रोजी पनवेलकडे जात असताना हायवेवर घडल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर जन्नतच्या चाहत्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. मात्र आता तिच्या टीमकडून अधिकृत निवेदन जारी करण्यात आले असून, त्यात दोघेही सुरक्षित असल्याची माहिती देण्यात आली आहे. सध्या पोलिस या प्रकरणाची चौकशी करत आहेत.

जन्नत जुबैरच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवरून तिच्या टीमने एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी सांगितले की, “जन्नत आणि अयान यांना दिवसाढवळ्या हायवेवर हिंसक प्रकाराचा सामना करावा लागला. या घटनेत त्यांच्यावर शारीरिक हल्ला करण्यात आला. मात्र सध्या दोघेही सुरक्षित आहेत आणि पोलिस या प्रकरणाची तपासणी करत आहेत.”

या पोस्टमध्ये टीमने चाहत्यांचे आभारही मानले आहेत. त्यांनी लिहिले की, “तुमच्या सततच्या सपोर्ट आणि काळजीबद्दल आम्ही आभारी आहोत.” तसेच अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. “कृपया फक्त अधिकृत माहितीलाच विश्वास ठेवा आणि अफवांपासून दूर राहा,” असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. ही बातमी समोर येताच सोशल मीडियावर चाहत्यांनी चिंता व्यक्त केली. अनेकांनी जन्नत आणि अयान यांनी स्वतःची काळजी घ्यावी, अशी प्रतिक्रिया दिली. काहींनी या हल्ल्याच्या आरोपींना लवकरात लवकर अटक व्हावी, अशी मागणीही केली आहे.



## बॅक टू वर्क!

# लग्नानंतर लगचेच कामावर परतली रश्मिका



नॅशनल क्रश रश्मिका मंदानाने दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडासोबत लग्नगाठ बांधली. या फेव्हरेट जोडीचा लग्नसोहळा मोठ्या धुमधडाक्यात पार पडला. काही मोजक्याच लोकांना लग्नासाठी आंमत्रित करण्यात आले होते. त्यानंतर दोघेही भारतात परतल्यानंतर त्यांच्या रिस्पेशन सोहळ्यासाठी बॉलिवूड इंडस्ट्रसह अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती. आता लग्नानंतर काही दिवसांतच बॅक टू वर्क म्हणत रश्मिका मंदाना कामावर परतली आहे. मैसा चित्रपटाच्या दिग्दर्शकाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत याबाबत माहिती दिली. पोस्टमध्ये चित्रपटाच्या सेटवरील एक दृश्य शेअर करत करण्यात आले आहे.

मैसा या चित्रपटाची चर्चा रश्मिकाचे लग्न होण्यापूर्वीपासून सुरू आहे. चित्रपटाचे फर्स्ट लूक पोस्टरही शेअर करण्यात आले होते. आता प्रत्यक्षात चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे.

‘मैसा’ हाय-ऑक्टेन इमोशनल ॲक्शन थ्रिलर चित्रपट असून, चित्रपटात रश्मिका एका वेगळ्या लूकमध्ये बघायला मिळणार आहे. जो तिने याअगोदर कोणत्याही चित्रपटात साकारलेला नाही. चित्रपटाचे दिग्दर्शन रवींद्र पुल्ले यांनी केले आहे. त्यांनीच चित्रपटाचे चित्रीकरण सुरू झाले असल्याचे पोस्टद्वारे सांगितले.

दिग्दर्शक रवींद्र पुले यांनी त्यांच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो पोस्ट केला. त्यांनी सेटवरील एक फोटो शेअर करून रश्मिकाला टॅग केले. त्यांनी त्याला ‘मैसा. सुरुवात झाली आहे.’ असे कॅप्शन दिले. त्यामुळे चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली असल्याचे स्पष्ट होते. रश्मिका मंदाना ‘मैसा’ या चित्रपटासह अनेक मोठ्या प्रोजेक्टमध्ये दिसणार असून, चाहते यासाठी उत्सुक आहेत.

# रिया चक्रवर्तीच्या स्टोअर ओपनिंगला फातिमा-विजय एकत्र



बॉलिवूडमध्ये सध्या अभिनेत्री फातिमा सना शेख आणि अभिनेता विजय वर्मा यांच्या नात्याबद्दल जोरदार चर्चा सुरू आहे. दोघेही अनेकदा एकत्र दिसत असल्यामुळे त्यांच्या रिलेशनशिपच्या अफवा वारंवार समोर येत आहेत. नुकतंच हे दोघे अभिनेत्री रिया चक्रवर्तीच्या स्टोअर ओपनिंग कार्यक्रमात एकत्र दिसले, ज्यामुळे पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलं आहे. रिया चक्रवर्तीने मुंबईमध्ये आपलं दुसरं स्टोअर सुरू केलं. या खास प्रसंगी तिने बॉलिवूडमधील जवळच्या मित्र-मैत्रिणींना आमंत्रित केलं होतं. या कार्यक्रमात फातिमा सना शेख उपस्थित होती. तिने या इव्हेंटमधील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले, ज्यामध्ये विजय वर्माही दिसत आहे.

या फोटोंमध्ये फातिमा आणि विजय यांच्यातील जवळीक स्पष्टपणे दिसून येते. एका फोटोमध्ये विजय वर्माने फातिमाच्या खांद्यावर डोकं ठेवलेलं दिसतं, ज्यामुळे चाहत्यांचं विशेष लक्ष वेधलं गेलं. हे फोटो व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्या नात्याबाबत चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. फातिमाने या पोस्टसोबत रिया चक्रवर्तीचं खास कौतुक केलं आहे. तिने लिहिलं की, “रिया, तुला दुसरं स्टोअर सुरू केल्याबद्दल खूप खूप शुभेच्छा. तुझ्या प्रवासाचा मला खूप अभिमान आहे. मी तुझ्याकडून खूप काही शिकले आहे. तुझ्यासारखी मजबूत आणि निडर व्यक्ती मी क्वचितच पाहिली आहे. अशीच पुढे जात राहा.” तिच्या या पोस्टलाही चाहत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# हिटमॅन 'इम्पॅक्ट प्लेअर' म्हणून खेळणार?

## आयपीएल २०२६ सुरू होण्यापूर्वी रोहितच्या भूमिकेबाबत मोठी चर्चा

**महाईन्यूज । मुंबई**

**इंडियन प्रीमिअर लीग २०२६ च्या तयारीला मुंबई इंडियन्सने सुरुवात केली आहे आणि माजी कर्णधार व हिटमॅन रोहित शर्मा संघाच्या कॅम्पमध्ये दाखल झाला आहे. रोहितने काल नेट्समध्ये दमदार फटकेबाजी केली, संघात पुनरागमन करणाऱ्या शार्दूल ठाकूरच्या गोलंदाजीवर त्याने खणखणीत षटकार खेचला. यावेळी ठाकूरने कॅचसाठी आवाज दिला, परंतु रोहितने त्याला स्टँडमध्ये कॅच पकड असा टोमणा मारला... मुंबई इंडियन्स यंदाच्या पर्वातही रोहितचा 'इम्पॅक्ट प्लेअर' म्हणून विचार करू शकते, अशी चर्चा आहे.**





रोहित शर्मा प्री-सीझन ट्रेनिंग कॅम्पमध्ये दाखल झाला असून तो नेट्समध्ये सराव करताना दिसत आहे. त्याच्या सरावाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहित नेटमध्ये आक्रमक फलंदाजी करत आपल्या सिग्नेचर पुल शॉट आणि मोठ्या फटक्यांचा सराव करत आहे. रोहितने केवळ फलंदाजीवरच नव्हे, तर फिटनेसवरही लक्ष केंद्रित केले आहे. सरावापूर्वी त्याने चपळता आणि हालचालींच्या सरावात भाग घेतला, यावरून हे स्पष्ट होते की, या वेळी तो पूर्ण तयारीने मैदानात उतरणार आहे.

रोहितचा इम्पॅक्ट प्लेअर म्हणून विचार होण्याचा अंदाज आहे. MI साठी तो सलामीला खेळताना दिसेल. आयपीएल २०२५ मध्ये रोहित काही सामन्यांत इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळला होता आणि याही पर्वात तसेच घडताना दिसेल. क्विंटन डी कॉक हा रोहितच्यासोबतील सलामीला खेळेल. रायन रिकेल्टनला या स्थानावर संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. विल जॅक्स तिसऱ्या क्रमांकावर कायम राहिल. त्यानंतर सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, नमन धीर व हार्दिक पांड्या अशी लाईनअप असेल.

MI ने RTM कार्डचा वापर करून नमनला आपल्या ताफ्यात राखले. कॉर्बिन बॉश हा मागच्या पर्वात रिप्लेसमेंट म्हणून मुंबईच्या संघात आला होता आणि तो याही पर्वात प्लेइंग इलेव्हनमध्ये दिसेल. दीपक चहर, ट्रेंट बोल्ट, जसप्रीत बुमराह हे जलदगती गोलंदाजी सांभाळतील.

### मुंबई इंडियन्स प्लेइंग इलेव्हन :

रोहित शर्मा, क्विंटन डी कॉक, विल जॅक्स, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, नमन धीर, हार्दिक पांड्या, कॉर्बिन बॉश, दीपक चहर, ट्रेंट बोल्ट, जसप्रीत बुमराह.

# सुनील गावस्करांचा पाकिस्तानात जन्मलेल्या खेळाडूने केला अपमान

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारताचे माजी खेळाडू सुनील गावस्कर यांनी पाकिस्तानी खेळाडूला विकत घेतल्यामुळे सनरायझर्स फ्रँचायझीला चांगलंच सुनावलं होतं. वृत्तपत्रातील आपल्या कॉलममध्ये सुनील गावस्कर यांनी सनरायझर्स लीड्स फ्रँचायझीने नुकत्याच झालेल्या लिलावात पाकिस्तानचा फिरकीपटू अबरार अहमद याला २.२३ कोटी खर्चून संघात घेतल्याच्या निर्णयावर भाष्य केलं होतं. सनरायझर्स ही फ्रँचायझी भारतीय मालकाची असल्याने गावस्करांनी टीका केली होती. यानंतर आता पाकिस्तानात जन्मलेल्या माजी खेळाडूने गावस्करांच्या या वक्तव्याविरूद्ध मोठं वक्तव्य केलं.**





सनरायझर्स फ्रँचायझी ही चेन्नईस्थित सन टीव्ही नेटवर्क कंपनीच्या मालकी असून, हीच कंपनी आयपीएलमधील सनरायझर्स हैदराबादचीही मालक आहे. "द हंड्रेड स्पर्धेत भारतीय मालक असलेल्या फ्रँचायझीने पाकिस्तानी खेळाडूला संघात घेतल्याने निर्माण झालेला वाद आश्चर्यकारक नाही. नोव्हेंबर २००८ मधील मुंबई हल्ल्यांनंतर भारतीय फ्रँचायझींनी आयपीएलमध्ये पाकिस्तानी खेळाडूंना पूर्णपणे दुर्लक्षित केले आहे," असं गावस्कर यांनी आपल्या कॉलममध्ये लिहिलं. यासोबतच पाकिस्तानच्या खेळाडूंना दिले जाणारे मानधन अप्रत्यक्षपणे त्या देशातील लष्करी कारवायांना हातभार लावू शकते, असेही गावस्कर यांनी नमूद केलं.

दरम्यान, गावस्कर यांच्या या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटली. कराचीमध्ये जन्मलेले माजी क्रिकेटपटू अजीम रफीक यांनी सोशल मीडियावरून या वक्तव्याचा निषेध केला. "हे वक्तव्य अतिशय वाईट आहे आणि याचा निषेध व्हायलाच हवा. अशी वक्तव्यं स्वीकारार्ह कशी असू शकतात? तुम्ही किती धावा केल्या याने मला काही फरक पडत नाही. गावस्कर यांच्याकडून आलेलं हे अतिशय घृणास्पद वक्तव्य आहे," असं त्यांनी एक्सवर लिहिलं.

"गावस्कर यांनी कोणत्याही सामन्याचं (पाकिस्तानच्या) समालोचन करण्यावर बहिष्कार टाकला आहे का? बहुधा नाहीच...," असं म्हणत त्यांनी दुसऱ्या पोस्टमध्ये टोला लगावला.

अबरारला संघात सामील करून घेतल्यानंतर, सनरायझर्स लीड्सचे मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरी यांनी सांगितलं होतं की, संघ व्यवस्थापनाने पाकिस्तानी खेळाडूंना न विकत घेण्याबद्दल कोणतीही चर्चा केली नव्हती. व्हेटोरी पुढे म्हणाले की, अनुभवी फिरकीपटू आदिल रशीदला संघात घेण्यात अपयशी ठरल्यानंतर फ्रँचायझीने निवडलेल्या काही मोजक्या खेळाडूंपैकी अबरार एक होता.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। बुधवार ।
दि. 18 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

"ISHWAR EDUCATION & CHARITABLE TRUST'S"

# SANT SAI ENGLISH MEDIUM HIGH SCHOOL

ADINATH NAGAR, GAVHANE VASTI, BHOSARI, PUNE - 411039

ACHIEVEMENT THROUGH EFFORTS

ESTD. : 1990

**(Fully digitalized School)**

Website: www.santsaischool.com

Email Id: sant.sai.school@gmail.com

## ACTIVITIES INCLUDE:

- Instrumental and vocal music
- Sports and games
- Arts, crafts, and performing arts
- Yoga, meditation & spiritual wellness
- Social outreach & volunteering
- Cultural and national celebrations
- Educational excursions
- Life skill internships & leadership programs
- Robotics & Kreedo Lab

(Year : 2026 - 2027)

## ADMISSION OPEN FOR ALL CLASSES








**OPENING SOON**

For details contact :

☎ : 020 - 27124849

JMB GURUKUL

Ishwar Education & Charitable Trust Presents

# "JMB Gurukul"

# टेम्पोखाली सापडून ११ वर्षीय मुलीचा मृत्यू

## टेम्पो अचानक मागे येत असल्याचे लक्षात येण्यापूर्वीच ती टेम्पोच्या चाकाखाली आली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**गॅस सिलेंडरची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा हँडब्रेक लावण्यास चालक विसरल्याने टेम्पो अचानक मागे सरकला. या टेम्पोखाली चिरडल्याने ११ वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. १६ मार्च) दुपारी साडेचारच्या सुमारास सोमाटणे फाटा परिसरात घडली.**




ज्ञानेश्वरी मुन्हे (वय ११) असे मृत्यू झालेल्या चिमुरडीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमाटणे फाटा परिसरात गॅस सिलेंडरची वाहतूक करणारा टेम्पो उतारावर होता. मात्र चालकाने टेम्पोचा हँडब्रेक व्यवस्थित लावला नाही. त्यामुळे काही वेळातच टेम्पो अचानक मागे सरकू लागला.

त्यावेळी ज्ञानेश्वरी मुन्हे ही परिसरातील इतर मुलांसोबत रस्त्यालगत खेळत होती. टेम्पो अचानक मागे येत असल्याचे लक्षात येण्यापूर्वीच ती टेम्पोच्या चाकाखाली आली. या भीषण अपघातात ती गंभीर जखमी झाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने तिला जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेले. डॉक्टरांनी तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. निष्काळजीपणामुळे चिमुरडीचा जीव गेल्याने स्थानिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित चालकावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी पुढील तपास सुरू असून संबंधित चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी दिली.

### निष्काळजीपणामुळे वाढते अपघात

वाहने उतारावर उभी करताना हँडब्रेक न लावणे किंवा सुरक्षितता नियमांचे पालन न करणे ही गंभीर बाब आहे. अशा छोट्या वाटणाऱ्या चुका जीवघेण्या ठरू शकतात. प्रशासनाने याबाबत कडक अंमलबजावणी आणि जनजागृती करण्याची गरज व्यक्त होत आहे.

### नागरिकांचा संताप...

या घटनेनंतर स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. "निष्काळजी चालकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अन्यथा अशा घटना पुन्हा घडतील," अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# स्थायी समिती बैठकीत विविध विकासकामांना मान्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरातील विविध विकासकामांसह पाणीपुरवठा, विद्युत देखभाल, सीसीटीव्ही यंत्रणांची दुरुस्ती तसेच विविध विभागांशी संबंधित विषयांना येणाऱ्या खर्चास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह स्थायी समिती सदस्य व महापालिका अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील विविध विकासकामांशी संबंधित विषयांवर चर्चा करून त्यांना मान्यता देण्यात आली. यामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत प्रभाग क्रमांक-२ मधील PIECC परिसरात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळा परिसराचे सुशोभीकरण व कलात्मक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच त्या परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, एआर-व्हीआर तंत्रज्ञानासह विद्युत विषयक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात आली.

याशिवाय यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, महापालिकेच्या शाळा, प्रशासकीय इमारती तसेच विविध प्रभागांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामांसाठीच्या निविदांनाही स्थायी समितीने मंजुरी दिली. तसेच पाणीपुरवठा यंत्रणा, पंपहाऊस, ट्रान्सफॉर्मर व विद्युत यंत्रणांशी संबंधित विविध कामांसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच महापालिकेच्या विविध इमारती, शाळा व दवाखान्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्यासाठीच्या कामास मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय पुणे महानगर परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या फरक रकमेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी महापालिकेच्या वाट्याचा निधी अग्रिम स्वरूपात देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीत शहरातील विविध विकासकामे, पायाभूत सुविधा व प्रशासनाशी संबंधित विषयांवर चर्चा करून आवश्यक निर्णय घेण्यात आले. याशिवाय स्थायी समितीतील सदस्यांच्या उपसूचनांसह महापालिकेच्या अंदाजपत्रकास स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली.

### विकासकामांना गती

स्थायी समिती बैठकीत शहरातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देत विविध विभागांच्या कामांना मंजुरी देण्यात आली; पाणीपुरवठा यंत्रणा, पंपहाऊस, ट्रान्सफॉर्मर व विद्युत देखभाल, महापालिका शाळा व इमारतींची देखभाल, तसेच सीसीटीव्ही यंत्रणांच्या वार्षिक दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्यात आला असून शहरातील विकासकामांना गती देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### महत्त्वाचे निर्णय एका नजरेत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत शहरातील विविध विकासकामे, पाणीपुरवठा, विद्युत देखभाल व सीसीटीव्ही यंत्रणांच्या दुरुस्तीसाठी निधीस मान्यता देण्यात आली; PIECC परिसरात छत्रपती संभाजी महाराज पुतळा परिसर सुशोभीकरण व एआर-व्हीआर तंत्रज्ञानासह रोषणाई, रुग्णालये व शाळांतील सीसीटीव्ही देखभाल, पाणी टाक्यांच्या स्वच्छतेस मुदतवाढ तसेच पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांच्या वेतन फरकासाठी निधी देण्यासही मंजुरी देण्यात आली.

# साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही भरता येणार मालमत्ता कर!

## गुढीपाडवा व रामनवमीला मालमत्ता कर भरण्यासाठी कार्यालय राहणार खुले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू असून नागरिकांना अधिक सोयीस्कर पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आता अवघे १५ दिवस शिल्लक राहिले असून या पार्श्वभूमीवर कर वसुलीला गती देण्यात येत आहे. नागरिकांना कर भरण्यास अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर भरण्याची सोय उपलब्ध होणार आहे.**




या महिन्यात दि. १९ मार्च रोजी गुढीपाडवा तसेच दि. २६ मार्च रोजी श्री राम नवमी या सार्वजनिक सुट्ट्या असून त्या दिवशीही सर्व विभागीय कर संकलन कार्यालये नागरिकांसाठी खुली ठेवण्यात येणार आहेत. या कालावधीत सर्व कार्यालयांतील कॅश काऊंटर सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ या वेळेत सुरू राहणार आहेत. यामुळे कामकाजाच्या दिवशी वेळ काढणे शक्य नसलेल्या नागरिकांनाही सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर भरण्यासाठी १८ विभागीय कर संकलन कार्यालये कार्यान्वित असून या कार्यालयांमध्ये प्रत्यक्ष कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन पद्धतीनेही मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी कार्यालयात येऊन किंवा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन माध्यमातून सहजपणे कर भरू शकतात.

### अवघे १५ दिवस शिल्लक

पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी अवघे १५ दिवस शिल्लक राहिले आहेत. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता कर एकरक्कमी भरल्यास विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत दिली जात आहे. आतापर्यंत ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी ८०६ कोटी ७८ लाखांचा भरणा केला आहे. महापालिकेच्या अभय योजनेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दि. १ मार्चपासून १४ मार्चपर्यंत १७ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. तसेच अभय योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत ५१ कोटी ११ लाख रुपयांचा मालमत्ता कर भरणा झाला आहे. यात थकबाकीदारांना १३ कोटींची सवलत देण्यात आली आहे.

> नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी अधिक सोयी उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. त्यानुसार साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कर संकलन कार्यालये सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुढीपाडवा व श्रीराम नवमीच्या दिवशीही नागरिकांना कर भरण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला मालमत्ता कर वेळेत भरून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> – **रवि लांडगे,** महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका





> चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस मालमत्ता कर वसुलीला गती देण्यासाठी कर संकलन विभागामार्फत विशेष नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांना कर भरण्यासाठी अधिक वेळ व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी कार्यालयात येऊन किंवा ऑनलाईन माध्यमातून आपला थकीत तसेच चालू वर्षाचा मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा.
>
> – **डॉ.विजय सूर्यवंशी,** आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पिंपरीत अमली पदार्थविरोधी कारवाई; दांपत्य अटकेत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या कारवाईत बेकायदेशीरपणे अंमली पदार्थांचा साठा करणाऱ्या दांपत्याला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई रविवारी (दि. 15) दुपारी जांभे येथील एका गोदामावर करण्यात आली**



पोलिस शिपाई मितेश यादव यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कैलास दत्तात्रय मांढरे (54, रा. म्हाळसाकांत चौक, आकुर्डी) आणि त्याच्या पत्नीला अटक केली आहे. त्यांच्यासह रितेश गुप्ता (रा. कनोज, उत्तर प्रदेश) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी त्यांच्या गोदामात अंमली पदार्थ मिश्रित पावडर, द्रव पदार्थ साठवून ठेवला. याबाबत माहिती मिळाली असता पोलिसांनी छापा मारून कारवाई करत कैलास आणि त्याच्या पत्नीला अटक केली.

या कारवाई मध्ये पोलिसांनी अमली पदार्थ मिश्रित पावडर, द्रव पदार्थ, मशीन, मोबाईल आणि एक चारचाकी गाडी असा एकूण 6 लाख 63 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी हे अंमली पदार्थ मिश्रित काळा पदार्थ पानामध्ये टाकून खाण्यासाठी तयार करून विकत असत.

हा माल त्यांनी उत्तर प्रदेशातील आरोपीकडून मागवला असल्याचे तपासात समोर आले आहे. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

# पालकत्व : पेपर कसा झाला?' साधा प्रश्न, पण संवेदनशील क्षण

परीक्षा संपल्यानंतर शाळेच्या गेटबाहेर येताना प्रत्येक मुलाची भावनिक अवस्था वेगळी असते. काही मुलं हसतमुख दिसतात, तर काहींच्या मनात अजूनही प्रश्नपत्रिकेचे विचार सुरू असतात. अशा वेळी आपण प्रेमाने विचारतो — "पेपर कसा झाला?" हेतू सकारात्मक असतो; पण त्या क्षणी मुलाचा मेंदू आधीच थकलेला आणि ताणाखाली असतो, हे लक्षात घ्यायला हवे. परीक्षेदरम्यान स्मरणशक्ती, एकाग्रता आणि निर्णयक्षमता उच्च पातळीवर काम करत असतात. ताण-हॉर्मोन्स लगेच कमी होत नाहीत. त्यामुळे पेपरनंतर लगेच विश्लेषण सुरू झाल्यास मुलाला नकळत "माझं मूल्यांकन चालू आहे" अशी भावना येऊ शकते. परिणामी चिडचिड, गप्प बसणं किंवा "पेपर खराब झाला" अशा



अति-प्रतिक्रिया दिसतात.

पालकांनी काय करावे? — ५ कृतीशील पावले

१. डी-कंप्रेशन वेळ द्या
पेपरनंतर किमान 30–60 मिनिटे अभ्यास, गुण किंवा चुका यावर चर्चा टाळा.

२. संवादाचा सूर बदला
"पेपर कसा झाला?" ऐवजी विचारा:
– "आता कसं वाटतंय?"
– "खूप थकवा आला असेल, आधी काही खाऊया का?"

३. भावना ऐका, लगेच उपाय देऊ नका
जर मुलाने चिंता व्यक्त केली तर ताबडतोब विश्लेषण करू नका. सांगा — "ठीक आहे, एक पेपर सगळं ठरवत नाही."

४. तुलना टाळा
मित्रांनी काय लिहिलं यावर चर्चा केल्याने ताण वाढतो. मुलाला प्रयत्नावर लक्ष केंद्रित करायला शिकवा.

५. योग्य वेळी आढावा घ्या
दुसऱ्या दिवशी शांतपणे पेपरचे विश्लेषण करा — दोष शोधण्यासाठी नाही, सुधारण्यासाठी.

NEURO PARENTING चा मूलमंत्र आहे — "CONNECTION BEFORE CORRECTION."

भावनिक सुरक्षितता निर्माण झाली कीच मुलाचा मेंदू शिकण्यासाठी खऱ्या अर्थाने तयार होतो.

परीक्षा ज्ञानाची असते; पण पेपरनंतरचा संवाद — पालकांच्या भावनिक परिपक्वतेची असते.

- डॉ. स्नेहल महेशकर
मानसशास्त्रीय समुपदेशक
NEURO-PARENTING व
SMART STUDIES MENTOR
7028493736




# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

चिखली येथील संविधान चौक परिसरात शनिवारी (दि. 14) रात्री झालेल्या भीषण अपघातात 50 वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. रवींद्र पांडुरंग सांगळे (वय 50) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी चिखली पोलिसांनी ट्रक चालकाला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविंद्र सांगळे हे त्यांच्या शाईन मोटारसायकलवरून जात असताना वेगात आलेल्या ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. हा ट्रक आरोपी जितेंद्र रामसंजीवन पटेल (वय 35, रा. इंदोरी बायपास, तळेगाव एमआयडीसी; मूळ- इटमा, मध्यप्रदेश) याच्या ताब्यात होता. त्याने वाहन बेदरकार व निष्काळजीपणे चालविल्याने हा अपघात घडल्याचे समोर आले आहे.

या अपघातात गंभीर जखमी झालेल्या सांगळे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी मृताच्या पत्नीने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी आरोपी चालकाला अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# बुद्ध तत्त्वज्ञान-मूल्यांचा उद्योग, व्यवस्थापनात उपयोग करा : डॉ. पानसरे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान, संतुलित विचार आणि जबाबदार कृती या मूल्यांचा उद्योग आणि व्यवस्थापन क्षेत्रासाठी उपयोग केल्यास उत्तम व्यवसाय स्थापित करता येऊ शकतो. जग जागतिक परिवर्तनाच्या टप्प्यातून जात असून भूराजकीय पुनर्रचना घडत आहेत. जसे की चीनने पुरवठा साखळी व्यवस्थापनात मोठी प्रगती केली असली तरी भारतासारख्या विकसनशील देशांसाठी उत्पादन क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होत आहेत असे प्रतिपादन उद्योगतज्ज्ञ डॉ. प्रशांत पानसरे यांनी केले.**







पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) येथे "इन्स्पायर २०२६ शाश्वत पद्धती, नवोपक्रम आणि जबाबदार उद्योजकता" या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती.

यावेळी बातांगा विद्यापीठ फिलिपाईन्स डॉ. पॅस्टर आर्गुएल्स, एसआयआयटी थम्मसात विद्यापीठ थायलंड डॉ. थनवडी चिंडा, वर्कस्टर विद्यापीठ युके डॉ. पाओलो मोरा-अव्हीला, राजाभट्ट युनिव्हर्सिटी थायलंड डॉ. अरुण चेनीत, एसबीपीआयएम संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक विभागप्रमुख डॉ. रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

डॉ. प्रशांत पानसरे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य हे देशातील डेटा सेंटर कॅपिटल म्हणून वेगाने विकसित होत आहे, ज्यामुळे डिजिटल अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे. वाढती लोकसंख्या, गरिब रेषेखालील लोकांचे वाढते उत्पन्न आणि तरुणांची वाढती संख्या यामुळे भारत जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा घटक बनत आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात चिप डिझाईन, संशोधन आणि तंत्रज्ञान विकास यामध्ये भारताने पुढाकार घ्यावा, तर उत्पादन प्रक्रियेतील काही भाग जागतिक स्तरावर आउट सोर्सिंगद्वारे विकसित होऊ शकतो. तसेच डिजिटल इनोव्हेशन, डेटा ॲनालिटिक्स आणि डिमांड फोरकास्टिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे उद्योगक्षेत्रात नव्या संधी निर्माण होत आहेत असे उद्योगतज्ज्ञ डॉ. प्रशांत पानसरे म्हणाले.

डॉ. दिलीप पवार, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. संतोष शिंदे यांनी नियोजन केले. सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन आणि डॉ. योगेंद्र देवकर यांनी आभार मानले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ही आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली.

## तब्बल २४० संशोधनपर लेख सादर

या परिषदेसाठी एकूण ५३८ सहभागींनी नोंदणी केली आणि २४० संशोधनपर लेख सादर केले. भारत, अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, फिलिपिन्स, थायलंड, लेबनॉन आणि दुबई या देशांतील संशोधकांचा यात समावेश होता. या परिषदेस वॉर्सेस्टर युनिव्हर्सिटी ऑफ युनायटेड किंग्डम, वॉर्सेस्टर बिझनेस स्कूल यांचे सहकार्य मिळाले होते. जर्नल प्रेस ऑफ इंडिया ही संस्था प्रकाशन भागीदार होती. यावेळी तीन जागतिक विद्यापीठांसोबत संशोधन करार करण्यात आला. या परिषदेत पॅनालिस्ट राजाभट्ट युनिव्हर्सिटी थायलंड डॉ. अरुण चेनीत, वर्कस्टर विद्यापीठ युके डॉ. पाओलो मोरा-अव्हीला, सायबर इलेक्ट्रॉनिक वारफेअर आर्मी वॉर कॉलेज कर्नल डॉ. वीरेंद्र मिश्रा, स्किलव्हेर्ज सीईओ जय ढोलकिया, सेल्स मार्केटिंग प्रमुख थंबूराज अंथुवन, एसबीपीआयएम समन्वयक प्रा. भूषण परदेशी यांनी सहभागीं सोबत व्यवस्थापन, शाश्वत विकास, जबाबदार व्यवसाय नवोन्मेष आणि डिजिटल परिवर्तन यांसारख्या विषयांवर चर्चा केली.